# जीनियस कन्सल्टंट्स देशभरात सेवा सुरु करणार

■ **प्रतिनिधी**
मुंबई

स्टाफ सोल्युशन देणारी १४० करोड रुपये ची कंपनी जीनियस कन्सल्टंट्स लिमिटेडने संपूर्ण देशभर फॅसिलिटी मॅनेजमेंट एंड सिक्योरिटी सर्विस (एफएमएस) सुरु करण्याची घोषणा केली आहे. जीनियस कन्सल्टंट लिमिटेडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक आर. पी. यादव म्हणाले सर्व चंदीगड, लखनऊ, पटना, गुवाहाटी, भुवनेश्वर इत्यादी सर्व मेट्रो शहरांसह सुविधा व्यवस्थापन व सुरक्षा सेवा देशभरात देणार आहोत. त्यामुळे जीनियस कन्सल्टंट्स लिमिटेड महसूल रु. २०२३ पर्यंत १०० कोटी पर्यंत नेण्याचे लक्ष ठेवले आहे. आम्ही बाजारपेठेच्या गरजा समजून घेण्यासाठी सतत संशोधन करीत आहोत आणि त्यानुसार आमच्या सेवा वाढविल्या जातात. शहरांमध्ये हा विस्तार आम्हाला आगामी आर्थिक वर्षात आमच्या व्यावसायिक ध्येय गाठण्यास मदत करेल.

ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा व प्रकल्प व्यवस्थापक संघटनेच्या म्हणण्यानुसार, पुढील पाच वर्षांत भारतीय सुविधा व्यवस्थापन उद्योग १७ टक्क्यांनी वाढून १९ अब्ज अमेरिकन डॉलर्सवर जाण्याची शक्यता आहे. जीनियस कन्सल्टंट्स लिमिटेड त्यांच्या सुविधा व्यवस्थापन विभागात सॉफ्ट आणि हार्ड सेवा दोन्ही उपलब्ध करते.

सॉफ्ट सर्विसेसमध्ये हौसकिपींग सर्व्हिसेस, ऑफिस सपोर्ट स्टाफ, रिसेप्शन आणि हेल्पडेस्क व्यवस्थापन, विक्रेता व्यवस्थापन, मागणी / खरेदी अधिकृत कार्यालय उपकरणे आणि वेअर हाऊस व्यवस्थापन यांचा समावेश आहे.